जसप्रीत बुमराह मँचेस्टर टेस्टमध्ये खेळणार!

मँचेस्टर, वृत्तसंस्था । भारतीय कसोटी क्रिकेट संघाला इंग्लंड विरूद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात २२ धावांनी पराभूत व्हावं लागलं. लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडमध्ये अंत्यत चुरशीच्या लढतीत भारताचा अखेरच्या क्षणी पराभव झाला. इंग्लंडने दिलेल्या १९३ धावांचा पाठलाग करताना भारताचा डाव हा १७० धावांवर आटोपला. इंग्लंडने यासह ५ सामन्यांच्या मालिकेत २-१ अशा फरकाने आघाडी घेतली. त्यामुळे आता टीम इंडियाला मालिका जिंकण्यासाठी उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील. तर त्याआधी मालिकेत कायम राहण्यासाठी कोणत्याही स्थितीत चौथ्या सामन्यात विजय मिळवावा लागेल. त्यामुळे चौथा कसोटी सामना भारतासाठी आव्हानात्मक ठरणार आहे.

उभयसंघातील चौथा सामना हा मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियममध्ये होणार आहे. या सामन्याला २३ जुलैपासून सुरुवात होणार आहे. भारतासाठी हा सामना ङ्कंकरो या मरो असा आहे. मात्र त्याआधी टीम इंडियाच्या गोटातून मोठी बातमी समोर आली आहे. टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याने वर्कलोड मॅनेजमेंटमुळे इंग्लंड दौऱ्यातील ५ पैकी फक्त ३ सामन्यांमध्येच खेळणार असल्याचे स्पष्ट केले आहे. बुमराह २ सामने खेळला आहे. त्यामुळे बुमराह चौथ्या सामन्यात खेळणार की पाचव्या? याबाबत आता मोठी माहिती समोर आली आहे.

बुमराह लीड्समध्ये झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात खेळला. त्यानंतर बुमराहला दुसऱ्या सामन्यात विश्रांती देण्यात आली. तर बुमराहने तिसऱ्या सामन्यातून कमबॅक केलं. बुमराह कोणत्या ३ सामन्यात खेळणार हे आम्ही परिस्थितीनुसार ठरवू, असं हेड कोच गौतम गंभीर याने काही आठवड्यांपूर्वी पत्रकार परिषदेत म्हटलं होतं. तिसऱ्या सामन्यातील पराभवानंतर टीम इंडिया बॅकफुटवर गेली आहे. त्यामुळे बुमराह चौथ्या सामन्यात खेळणार की नाही? याबाबत नक्की काय समोर आलंय? रेवस्पोर्ट्सनुसार, बुमराह मँचेस्टर टेस्टसाठी उपलब्ध आहे. बुमराहने आतापर्यंत या मैदानात एकही सामना खेळलेला नाही. बुमराहने तिसऱ्या कसोटीत एकूण ७ विकेट्स घेतल्या.

थोडक्यात...

उर्वेश साळुंखे यांची तालुका अध्यक्षपदी निवड

■ लासूर। वार्ताहर

बुधगाव येथील रहिवासी उर्वेश लक्ष्मण साळुंखे यांची माजी मदत पुनर्वसन मंत्री आमदार अनिलदादा पाटील व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राकेश सोनार यांच्या हस्ते राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस चोपडा ग्रामीण तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या प्रसंगी जिल्हाअध्यक्ष राकेश सोनार, अँड देवकद पाटील,नानाभाऊ सोनवणे, भूपेंद्र पवार, हर्षल साळुंखे आदी उपस्थित होते. आपण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रांतअध्यक्ष सुनील तटकरे यांना अभिप्रेत असणारी संघटना बांधण्यासाठी प्रयत्नशील राहील व पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची ध्येय धोरण सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी पक्षाला आपले सहकार्य राहील असा विश्वास नवनियुक्त अध्यक्ष उर्वेश साळुंखे यांनी व्यक्त केला. या निवडी बद्दल तालुक्याच्या व जिल्ह्याच्या सर्व पद अधिकारी यांनी अभिनंदन केले.

पाल येथे जागतिक युवा कौशल्य दिन

■ पाल । वार्ताहर

द.न. वाद्रेकर माध्यमिक आश्रम शाळा, पाल व गुरुकुल माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिन २०२५ निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपणाने झाली, तर स्वामी विवेकानंद व शिक्षणमहर्षी मधुकरराव चौधरी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापिका मंगलाताई झांबरे होत्या. डॉ. महेश महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मुख्याध्यापक भागवत पारधी, प्रवीण चौधरी, राजेंद्र भिरूड, नरेंद्र साठे, शिक्षिका सविता पाचपांडे , कोमल तडवी, रुपाली हिवरे,कैलास उत्तरदे, तस्लिम शाह, पवन पवार, प्रमोद पाटील, हिराचंद जावळे,पत्रकार सुरेश पवार, मनीष बाविस्कर तसेच इतर मान्यवर व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन मनीषा मालखेडे यांनी तर आभार कैलास उत्तरदे यांनी मानले.

कर्नाटक सरकारच्या अहवालाने वाढवली चिंता

चेंगराचेंगरी प्रकरणाचा विराटवर ठपका



बेंगळुरु, वृत्तसंस्था । आयपीएल २०२५ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचं जेतेपदाचं स्वप्न पूर्ण झालं. अखेर १७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर पदरी यश पडलं. पण या यशाच्या आनंदावर विरजण पडलं. त्यानंतर आरसीबीच्या पाठी चौकशीचा ससेमिरा लागला. कारण बंगळुरु झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे मैदानात आयोजित केलेला विजयोत्सव थोडक्यात गुंडाळण्याची वेळ आली. त्यानंतर आरोपप्रत्यारोपाच्या फैरी झडू लागल्या. कर्नाटक सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती डीफ्कुन्हा आयोग स्थापन केला होता. या आयोगाने दिलेल्या अहवालाची कर्नाटक सरकारने दखल घेतली आहे. बंगळुरु चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक सरकारने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनविरुद्ध फौजदारी खटला दाखल करण्याची मान्यता दिली आहे. ता विराट कोहलीवर देखील ठपका ठेवला आहे.आयोगाच्या अहवालात या चेंगराचेंगरीप्रकरणी अनियमितता आणि गैरप्रकार उघडकीस आला आहे. त्या आधारे आता पुढची कारवाई केली जाणार आहे. तर बंगळुरूच्या माजी पोलिस आयुक्तांसह पाच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना आधीच निलंबित करण्यात आले आहे.

४ जून रोजी झालेल्या घटनेत विराट कोहलीचं नाव देखील पुढे आलं आहे. विराट कोहलीने एका व्हिडीओच्या माध्यमातून चाहत्यांना फुकटात विजयी सोहळ्यात सहभागी होण्याची अपील केली होती. दुसरीकडे, कार्यक्रमाचं आयोजन करणाऱ्या डीएनए नेटवर्क प्रायव्हेट लिमिटेडने पोलिसांनी ३ जूनला फक्त सूचना दिली होती. पण आवश्यक त्या परवानग्या घेतल्या नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यांना हा कार्यक्रम करण्यास नकार दिला होता. मात्र असं असूनही

आरसीबीने सोशल मीडियावर ४ जून रोजी विजयी कार्यक्रमाचा प्रचार केला. चाहत्यांनी या कार्यक्रमासाठी एकच गर्दी केली. त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. रिपोर्टनुसार, या कार्यक्रमात तीन लाखाहून अधिक लोकांची गर्दी झाली होती.

आरसीबी, डीएनए आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून आला. गेट उघडण्यास उशीर झाल्याने चेंगराचेंगरी झाली. यात ७ पोलीस कर्मचारी जखमी झाले. तर ५० हून अधिक लोक जखमी झाले होते. एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये ४० हजारांपेक्षा कमी लोक बसू शकतात. कार्यक्रमादरम्यान३ लाखाच्या आसपास लोकं आले होते. त्यामुळे चेंगराचेंगरी झाली.

चोपड्याच्या ललित कला केंद्राचा निकाल १०० टक्के

■ चोपडा, । प्रतिनिधी

ललित कला संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत शासकीय उच्च कला परीक्षा मंडळ मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत भगिनी मंडळ संचलित ललित कला केंद्राचा एटीडी प्रथम व द्वितीय वर्षा चा निकाल १००टक्के लागला असून,यंदा देखील ललित कला केंद्राने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.एटीडी प्रथम वर्षात पूजा अरुण महाजन (अमळनेर) प्रथम, देवांशी जितेंद्र कुमार पितरोडा (धरणगाव) द्वितीय तर सुरेखा सुरसिंग पावरा (नंदुरबार) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच एटीडी द्वितीय वर्षात कल्याणी सुनील पाटील (कुसूंबा) प्रथम,साक्षी सुधाकर पाटील (चहार्डी) द्वितीय तर अनिल अनुज बडगुजर (चोपडा) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. पूनमबेन गुजराथी,सहसचिव श्रीमती अश्विनीबेन गुजराथी, समाजकार्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य आशिष गुजराथी तसेच ललित कला केंद्राचे प्राचार्य सुनील बारी,प्रा.विनोद पाटील,प्रा.संजय नेवे व भगवान बारी,अतुल अडावदकर व प्रवीण मानकरी,संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी आदींनी अभिनंदन केले आहे.

हिंदू जनजागृती न्यासातर्फे यावलला अन्नदान

■ यावल । प्रतिनिधी

यावल तालुक्यातील यावल जवळील गोळीबार टेकडी येथील आदिवासी पाडा येथे हिंदू जनजागृती न्यासातर्फे आदिवासी बांधवांना व त्यांच्या मुलांना अन्नदान करण्यात आला

आपल्या महाराष्ट्रातील पहाडपट्टीत राहणारा आदिवासी बांधव हा राजकारणी ,समाजकारणी यांच्यापासून दुर्लक्षित असलेला समाज आहे त्या समाजा पर्यंत परिपूर्ण असे शिक्षण आरोग्य अजून पर्यंत पोहोचू शकले नाही त्यांच्यापर्यंत या सर्व गोष्टी पोहोचण्याचा मानस ठेवून हिंदू जनजागृती न्यासा तर्फे कपडे वाटप ,खाऊ वाटप ,आदिवासींच्या गरजेच्या वस्तू वाटप करणे तसेच रक्त तपासणी करणे, आरोग्य तपासणी करणे असे विविध उपक्रम महाराष्ट्रभर घेण्यात येतात याचाच एक भाग म्हणून हिंदू जनजागृती न्यास जळगाव तर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त यावल तालुक्यातील यावल जवळील गोळीबार टेकडी येथे आदिवासी पाड्यात आदिवासी बांधवांना व त्यांच्या मुला मुलींना अन्नदान हिंदू जनजागृती न्यासाच्या सौ. छाया भोळे यांच्या हस्ते करण्यात आला गोळीबार टेकडी येथील ग्रामस्थांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले आहे आणि शब्द दिला आहे की यापुढे न्यासाला जर काही मदत लागली तर नक्की करू याप्रसंगी हिंदू जनजागृती न्यासाचे मनीषा भोळे ,विद्या फेगडे ,धीरज भोळे हे उपस्थित होते.

रावेर एमआयडीसीसाठी जागा हस्तांतरणास मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील

■ धुळे । प्रतिनिधी

धुळ्याच्या औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी शहरालगत रावेर परिसरातील २०७७ एकर जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला आहे. तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार नागरी सुविधा आणि उद्योग विस्तारासाठी लॉजिस्टिक हब (ड्राय पोर्ट व स्टोअरेजसाठी विशेष टर्मिनल) उभारणे अत्यावश्यक आहे. यासाठी तांत्रिक, आर्थिक व लॉजिस्टिक दृष्टीने व्यवहार्यता तपासावी व तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार हब उभारण्याच्या कार्यवाहीस अधिकाधिक गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

धुळे शहराच्या विकासासंदर्भातील विविध मागण्यांसह महापालिकेच्या विविध प्रकल्पांबाबत आ. अनुप अग्रवाल यांच्या विनंतीवरून काल मुंबईतील विधानभवनात विविध विभागांच्या मंत्र्यांसह सचिवस्तरीय अधिकाऱ्यांची विशेष बैठक झाली, त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध प्रकल्पांना मंजुरीच्या दृष्टीने कार्यवाहीचे निर्देश दिले. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार अनुप अग्रवाल, अपर मुख्य सचिव असिम गुप्ता, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.

धुळ्याचे आ.अनुप अग्रवाल यांच्या मागणीनुसार विशेष बैठक

वेलरासू, धुळ्याच्या जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते (दूरदृश्य प्रणालीद्वारे), निवासी उपजिल्हाधिकारी महेश शेलार, विभागीय वनअधिकारी नितीनसिंग, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील आदी उपस्थित होते.

आ.अग्रवाल यांनी धुळे शहरातील औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीकरणासाठी रावेर परिसरातील २०७७ एकर जागा एमआयडीसीकडे हस्तांतरित करणे, थीम पार्क उभारण्यासाठी सर्व्हे क्र. ५१० ही जागा उपलब्ध करणे, धुळे येथील सीटीएस क्र. ३५३७ मध्ये वर्किंग वूमेन्स होस्टेल बांधण्यासाठी म्हाडाला जागा उपलब्ध करून देणे, स्टॉर्म वॉटरच्या प्रस्तावास मंजुरी देणे, तापी योजनेवरून डीआय पाइपलाइनच्या प्रस्तावास मंजुरी देणे, महापालिकेच्या ७५ एकर जागेवर सोलर प्रकल्प उभारणे, शहर मंजूर विकास योजनेतील सर्व्हे क्र. ५२९ या जमिनीवरील आरक्षण वगळून ते क्षेत्र रहिवास भागात समाविष्ट करणे, पांझरा रिव्हर फ्रंटच्या प्रस्तावाला मंजुरी देणे आदी विषय बैठकीत मांडले.

रावेर एमआयडीसीसाठी जागेबाबत निर्देश

धुळे शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार नागरी सुविधा आणि उद्योग विस्तारासाठी रावेर परिसरातील दोन हजार एकर जागा एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्यासाठी कार्यवाही करावी. रावेर परिसरातील एमआयडीसीमध्ये विविध उद्योगांसोबत ८५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार झाले असून, त्यातून मोठ्या प्रमाणात उद्योग विकासाला चालना मिळणार आहे. शिवाय हजारो तरुणांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना जागा उपलब्धतेबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. लॉजिस्टिक हब (ड्राय पोर्ट व स्टोरेजसाठी विशेष टर्मिनल) उभारणे अत्यावश्यक आहे. यासाठी तांत्रिक, आर्थिक व लॉजिस्टिक दृष्टीने व्यवहार्यता तपासावी, तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार हब उभारण्याच्या कार्यवाहीस गती द्यावी. धुळे एमआयडीसीला डी प्लस दर्जा देण्याबाबतही त्यांनी कार्यवाहीचे निर्देश दिले. तसेच नवीन उद्योगांना अतिरिक्त अनुदान देण्याबाबत चर्चा करून त्यावर सकारात्मकता दाखविली. शहरातील देवपूर, वलवाडी व शहराच्या सखल भागांत पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करावी.

बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी धुळे शहरात थीम पार्क उभारण्यासाठी सर्व्हे क्रमांक ५१० ड ची जागा आठ दिवसांत उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना दिले. शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन तापी योजनेवरून शहराला पाणीपुरवठ्यासाठी डीआय पाइपलाइन टाकणे, औद्योगिक प्रकल्पांसाठी सौरऊर्जा प्रकल्प बॅटरी स्टोअरेजसह उभारणे, भुयारी मलनिस्सारण योजनेसाठी निधी मंजूर करण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले. तसेच, धुळे शहरात दर वर्षी पाणी वितरण व पथदिव्यांसाठी महापालिकेचा ३२ ते ३३ कोटी रुपयांचा वीज खर्च होत असून, हा भार कमी करण्यासाठी महापालिकेच्या जागेवर सौर प्रकल्प उभारावेत, असेही मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५

--* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

मेष – सर्वतोपरी कार्य आपले मनाप्रमाणे.
वृषभ – सर्व काही मनाविरुध्द होईल.
मिथुन – काही कार्य मनाप्रमाणे काही मना विरुध्द.
कर्क – वडिलांचे स्मरण तेहतीस कोटी देवांचे स्मरण.
सिंह – आजचा दिवस नकोसा असा राहील.
कन्या – शारिरीक अस्वस्थता राहील.
तूळ – संसार गुण्या गोविंदाचा असेल.
वृश्चिक – व्यवसायातून आर्थिक लाभ मिळतील.
धनू – मुलांना वाहन चालविणेस देवू नका.
मकर – मातृसी वार्तालाप घडेल.
कुंभ – सवड मिळणार नाही इतकी कामे करावे लागतील.
मीन – पैशांच्या समस्या राहणार नाहीते.

जनतेच्या प्रश्नांसाठी महाराजस्व अभियान-तहसीलदार

■ शिंदखेडा । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यात जास्तीत जास्त नागरिकांच्या समस्या शासनातर्फे सोडवण्यात याव्या यासाठी प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करीत आहे. महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी पारदर्शक कार्यक्षम गतिमान प्रशासनासाठी महसूल विभागातर्फे दरवर्षी हे अभियान राबविण्यात येते. नागरिकांनी अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिंदखेडा तालुक्याचे तहसीलदार अनिल गवांदे यांनी केले.

शिंदखेडा तालुक्यातील सुकवद ता. शिंदखेडा येथे तालुका प्रशासन व सुकवद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजस्व अभियान शिबिर आयोजित करण्यात आले होते

सुकवद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजस्व अभियान शिबिर

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सभापती डी. आर. पाटील, सुकवदच्या सरपंच टीना मधुकर पाटील, मंडळ अधिकारी मोनाली अशोक धनगर, ग्रामपंचायत गटनेते मधुकर पाटील, उपसरपंच सदूभाऊसिंग पवार, विविध कार्यकारी सोसायटीचे मधुकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

शिंदखेडा तालुका महसूल विभागातर्फे महाराजास्व अभियानांतर्गत आयोजित शिबिरात विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. शासनाच्या महसूल विभागाशी थेट जनतेच्या संपर्क असल्याने सामान्य जनता यांच्या दैनंदिन कामकाज व विविध प्रश्न संदर्भात नेहमीच संपर्क येतो. यामुळेच शासनाच्या वतीने दरवर्षी एक जुलै ते ३१ जुलै महाराजा स्वाभिमान राबविण्यात येते. सुखवद येथील ग्रामपंचायतच्या गावठाण जागेचा सातबारा गावातील स्मशानभूमीसाठी व आदिवासी बांधवांसाठी दफनभूमीसाठी जागा वाटप तहसीलदार अनिल गवांदे यांच्या हस्ते देण्यात आले. जीवंत सातबारा अभियान, उत्कृष्ट घरकुल बांधणाऱ्यांच्या घरकुल मालकांच्या सत्कार, विविध प्रकारचे संजय गांधी योजना श्रावणबाळ योजना उत्पन्नाचे दाखले जातीचे दाखले, डोमासाईल आदी प्रमाणपत्रे ग्रामस्थांना देण्यात आली. प्रास्ताविक मंडळ अधिकारी मोनाली धनगर तर सूत्रसंचालन आभार तलाठी संतोष कोरे यांनी केले. याप्रसंगी दसवेल येथील तलाठी राजाराम जगताप, तावखेडा तलाठी सागर गोमासे, शशिकांत पाटील, प्रदीप श्रीधर पाटील, नागराज पाटील, विश्वास पाटील, तापीराम खैरनार, रावण धनगर, महारु धनगर, समाधान भिल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)